# Blend: A Tapestry of Multi-Disciplinary Narratives

ENGLISH PART - II, MARATHI & HINDI




**EDITOR IN CHIEF**

**Prof. Dr. Ujwala Vijay Patil**
Head, Department of English,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya,
Ramanandnagar (Burli), Sangli.

**Mr. D. A. Sasane**
Assistant Professor, Department of Chemistry,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya,
Ramanandnagar (Burli), Sangli.



AJANTA PRAKASHAN

Rayat Shikshan Sanstha's
Dr. Patangrao Kadam Mahavidyalaya
Ramanandnagar (Burli), Dist.- Sangli. (M.S.)

# Blend: A Tapestry of Multi-Disciplinary Narratives

**ENGLISH PART - II, MARATHI & HINDI**

**EDITOR IN CHIEF**
**Prof. Dr. Ujwala Vijay Patil**
Head, Department of English,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**Mr. D. A. Sasane**
Assistant Professor, Department of Chemistry,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**ASSOCIATE EDITOR**
**Ms. Priyanka D. Jirage**
Head, Department of Mathematics,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**Ms. Anita B. Mamlayya**
Head, Department of Botany,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

**Anup P. Mugali**
Librarian,
Dr. Patangrao Kadam Mahabidyalaya, Ramanandnagar (Burli), Sangli.

AJANTA PRAKASHAN
Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Title**
Blend: A Tapestry of Multi-Disciplinary Narratives

**Editor**
Prof. Dr. Ujwala Vijay Patil
Mr. D. A. Sasane

**© Copy Right & Reserved with Author**

**Publisher**
**Ajanta Prakashan**
ISO 9001 : 2015 QMS
ISBN/ISSN
Jaisingpura, Near University Gate, Aurangabad. (M.S.)
Mobile No. : 9579260877, 9822620877
ajanta3535@gmail.com
www.ajantaprakashan.in

**Cover Design**
Gaurav Kachru Kumawat
Ajanta Computers & Printers
Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printer**
Om Offset, Aurangabad. (M.S.)

**First Edition**
December 2022

**ISBN : 978-93-83587-53-7**

**Rs.:-** 550/- Rs.

# CONTENTS OF ENGLISH PART - II


| Sr. No. | Title & Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | Review of $Fe2O3$ Nanoparticles in Enhancing Plant Growth<br>**Ms. N. J. Kamble**<br>**Dr. G. R. Patil**<br>**Mr. P. K. Bhagyawant**<br>**Ms. B. P. Jamadade**<br>**Ms. S. W. Wagh** | 1-3 |
| 2 | Role of Artificial Intelligence in Improving Human Lives and the Environment<br>**Ms. N. J. Kamble**<br>**Dr. G. R. Patil**<br>**Mr. P. K. Bhagyawant**<br>**Ms. B. P. Jamadade**<br>**Mr. Y. R. Sable** | 4-9 |
| 3 | Synthesis and Characterization of Bismuth Ferrite - A Multiferroic Material<br>**P. D. Barele**<br>**P. A. Patil**<br>**J. V. Kumbhar**<br>**P. N. Chavan**<br>**N. J. Sagare** | 10-14 |
| 4 | Preparation of Substituted Benzimidazole Derivatives<br>**P. N. Chavan**<br>**N. J. Sagare**<br>**S. B. Bagade**<br>**P. D. Barele**<br>**Ghodake P. R.** | 15-19 |
| 5 | Analysis of Pesticides Presentin Vegetable-Fruitby QuEChERS Methods<br>**Prajakta A. Patil**<br>**Priyanka R. Ghodake**<br>**Jagruti V. Kumbhar**<br>**Prajakta Chavan**<br>**Naina Sagre** | 20-22 |
| 6 | Chapter: Nanoparticles Chemistry in Gas Sensing<br>**Mr. Sable Y. R.**<br>**Mr. Gawari D. P.**<br>**Mr. Sasane D. A.**<br>**Bhagyawant P. K.**<br>**Devalkar K. P.** | 23-29 |

# CONTENTS OF ENGLISH PART - II


| Sr. No. | Title & Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 7 | Chapter: Metal Oxide in Organic Synthesis<br>**Mr. Sable Y. R.**<br>**Mr. Gawari D. P.**<br>**Mr. Sasane D. A.**<br>**Bhagyawant P. K.**<br>**Devalkar K. P.** | 30-34 |
| 8 | Big Development in Business with Help of Digital Marketing<br>**Sandhya S. Jadhav**<br>**Borade N. S.**<br>**Smita D. Patil**<br>**Baban D. Patil**<br>**Mugali A. P.** | 35-36 |
| 9 | Synthesis of Chalcones by Grindstone Chemistry<br>**Sasane D. A.**<br>**Gawari D. P.**<br>**Sable Y. R.**<br>**Bhagyawant P. K.**<br>**Devalkar K. P.** | 37-48 |
| 10 | Subaltern Movements in India: A Study<br>**Mr. Shinde Santosh Laxman**<br>**Mr. S. D. Kamble**<br>**Ms. S. N. Lavate**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Ms. Tatugade A. P.** | 49-53 |
| 11 | Nativism in the Context of Indian English Literature<br>**Mr. Shinde Santosh Laxman**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Mr. S. D. Kamble**<br>**Ms. Lavte S. N.**<br>**Ms. Tatugade A. P.** | 54-58 |
| 12 | Securing Software as a Service Model for Cloud Computing<br>**Smita D. Patil**<br>**Borade N. S.**<br>**Kadam A. P.**<br>**Sandhya Jadhav**<br>**Anup P. Mugali** | 59-61 |
| 13 | Narrative Innovations in the Postmodern Indian English Novels<br>**Mr. Sushen Dnyanu Kamble**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Ms. S. N. Lavate**<br>**Mr. S. L. Shide**<br>**Ms. Tatugade A. P.** | 62-65 |

# CONTENTS OF ENGLISH PART - II


| Sr. No. | Title & Authors Name | Page No. |
|---|---|---|
| 14 | Research in English Literature: A Comprehensive Review<br>**Mr. Sushen Dnyanu Kamble**<br>**Dr. S. L. Shinde**<br>**Ms. L. N. Lavate**<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Ms. Tatugade A. P.** | 66-69 |
| 15 | A Review of Contemporary Indian Women's Poetry in English<br>**Prof. Dr. U. V. Patil**<br>**Dr. S. L. Shinde**<br>**Mrs. S. N. Lavate**<br>**Mr. S. D. Kamble**<br>**Mr. S. S. Dounde** | 70-74 |
| 16 | Influence of pH on the Characteristics of ZnO Thin Films Fabricated via Chemical Bath Deposition: A Systematic Investigation<br>**G. R. Patil**<br>**Ms. N. J. Kamble**<br>**Ms. B. P. Jamadade**<br>**P. K. Bhagyavant**<br>**P. D. Jirage** | 75-82 |
| 17 | Economic Impacts of Artificial Intelligence in India<br>**Dr. Sou. Parvati B. Patil**<br>**Dr. A. S. Kamble**<br>**Mr. S. R. Kundle**<br>**Mrs. Pudale P. D.**<br>**Mr. Patil B. D.** | 83-89 |
| 18 | Advancements in the Application of SnO2 as a Photocatalyst<br>**B. P. Jamadade**<br>**G. R. Patil**<br>**N. J. Kamble**<br>**P. K. Bhagyawant**<br>**V. V. Nalawade** | 90-93 |

# २५. बौद्ध मूर्तीकला ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. सुनिता थोरबोले**
**प्रा. डॉ. दिलीप महादू कोने**
**प्रा. स्वाती प्रभाकर मगदूम**
**प्रा. स्नेहा डब्लु. वाघ**
**प्रा. अनिता बी. ममलया**
रयत शिक्षण संस्थेचे, डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, रामानंदनगर (बुर्ली), ता. पलूस, जि. सांगली.

**प्रस्तावना**

साहित्य निर्मिती बरोबरच युध्दचरित्र आणि बौध्द धर्माचे तत्वज्ञान व विचारसरणी स्थापत्य कला व शिल्पांच्या माध्यमातूनही व्यकत झाली, हे त्या काळाचे एक महत्वाचे वैशिष्टय मानावे लागेल. या कलेच्या बौध्द धर्म व तत्वज्ञानासंबंधी सविस्तर माहिती देणारे अनेक ग्रंथ आज उपलब्ध आहेत. याशिवाय बुध्दाचे चरित्र तसेच बौध्दत्वाबद्दल माहिती देणाऱ्या जातक कथा उपलब्ध आहेत. इस्लिंग, युआन-स्तंगसारख्या चिनी प्रवाशांनी सुध्दा आपल्या प्रचारांमधून या धर्माच्या भारतातील प्रसाराविषयी बरीच माहिती लिहून ठेवली आहे. अशा प्रकारे विपूल साहित्या बरोबरच विविधांगी आविष्काराने तत्कालीन संस्कृती ज्ञात झाली. बौध्द धर्माचे हे एक मोठे योगदान आहे. भारतात व भारताबाहेर अनेक स्तूप (बुध्दाचे स्मारक), चैत्य (यो प्रार्थना मंदिर) आणि विहार (बध्द भिक्षूंचे निवासस्थान) बांधले गेले आहे. त्याचबरोबर युध्द वैधिस्तव परिवारातील अनेक देवदेवतांच्या मूर्ती पडविल्या गेल्या. या कलाविष्काराने आपणास तत्कालिन धार्मिक आचार विचार, तसेच सामाजिक चालीरीती. रुढी, परंपरा काय होत्या हे समजते. बौध्द कलेचा आविष्कार अनेक प्रकारांनी झाला असला तरी या ठिकाणी आपणास फक्त बुध्दमूर्तीचा विचार करावयाचा आहे.

सारनाथ येथील गुप्तकालीन शिल्प- धर्मचक्रप्रवर्तनाचा प्रसंग दर्शविणारे बुध्दाचे गुप्तकालीन शिल्प (इ. स. ४थे ५ वे शतक) उत्तरप्रदेशात सारनाथ येथे मिळाले आहे. मथुरा कलासंप्रदायातील हे शिल्प मोठे विलोभनिय व मनोहारी आहे. या शिल्पकलात चटकन लक्ष्यात येणारी गोष्ट म्हणजे बुध्दमुर्तीच्या चेहऱ्यावरील भावदर्शन मूर्तीच्या चेह-यावरील भावशांत व आश्वासक आहेत. कारण कठोर तपश्चयेनंतर बुध्दाला दुःखाचे मूळ व त्यावरील उपाय सापडला आहे. त्यामुळे मी सर्वांना दुःखमुक्त करीन असे तो समस्त मानवजातीला आश्वासन देत आहे. बुध्दाच्या चेहऱ्यावरील हावभाव रेखाटणाच्या कलाकाराला बुध्दचरित्राचे नेमके - मर्म समजले आहे. या शिल्पामध्ये बुद्ध पद्मासन घालून बसला आहे. खाली धर्म चक्र आहे. त्याबरोबर काही हरणे दाखविली आहेत. त्याचे पाच अनुयायीसुध्दा बसलेले दिसतात. बुध्द धर्मचक्रप्रवर्तन मुद्रेत आहे. याचा अर्थ दिव्यज्ञान प्राप्त झाल्यानंतर बुध्दाने सारनाथ येथील मृगदायी बनात येऊन व्याख्यानाद्वारे प्रथमच आपले विचार मांडलेआणि धर्मप्रसारास सुरुवात केली. त्याच्या मस्तकाच्या मागे ज्ञानाचे प्रतीक म्हणून प्रभावळ दाखविली असून याचा अर्थ बुध्द ही एक असामान्य व सर्वश्रेष्ठ विभूती असून तो सदेह स्वर्गात गेली आहे. इतकी ती पुण्यवान आहे. बुध्दाचे दोन्ही हात गुडघ्यापर्यंत आले असून त्याच्या दोन्ही कानांची पाळी खांद्याला चिकटली आहे. ही महात्म्याची लक्षणे आहेत.

**महापरिनिर्वाणाचे शिल्प**

औरंगाबादजवळील अजिंठा येथील गुंफा क्र. २६ मध्ये गौतम बुध्दाच्या महापरिनिर्वाणाचे शिल्प रेखाटले आहे. हे एक उल्लेखनीय व लक्षवेधी आहे. येथे बुध्दाचे महापरिनिर्वाण शिल्पांकित केले असल्याने करुणरसाचा परिपोष झाला आहे. येथे बुध्द उजव्या अंगावर कललेला असून त्यातून त्याचा मृत्यू सूचित केला आहे. त्याच्या अवतीभोवती त्याचे अनुयायी व इतर असंख्य लोकांची गर्दी झालेली आहे. हे लोक गुडघ्यात अर्धवट डोके खुपसून बसले आहेत. व शोक करीत आहेत. त्या शोकामध्ये एक प्रकारच्या असुरक्षिततेची भावना आहे. त्यांना प्रचंड धक्का बसला आहे. बुध्द गेल्यानंतर आता आपले कसे होणार त्याच्या अनुपस्थितीत आपला निभाव लागणार आहे का ? आपण त्याच्या शिवाय जगू शकणार आहोत का?असे अनेक प्रश्न जमावातील लोकांना पडलेले स्पष्ट जाणवते. प्रत्येकाच्या अश्रूतून हे भाव हुबेहूब प्रकट होतात. हे शिल्प कोरणारा कलाकार तत्कालीन समाज भावनेशी किती एकरुप झाला होता. हे आपणास या शिल्पकलेतून दिसते. केवळ माणसेच नाही तर, हरणे माकडे आदि चतुष्पाद प्राणी सुध्दा येथे आले असून तेही शोक करीत आहेत. यावरुन तात्कालीन समाजाच्या मनामध्ये बुध्दाविषयी किती आदराचे स्थान होते हे आपणास समजते. या शिल्पात करुणरस ओतप्रोत भरला असल्यामुळे हे शिल्प पहाताना आपल्याही डोळयात पाणी आल्याशिवाय रहात नाही. भगवान बुध्दाने प्रथमपासूनच व्यक्तीपूजेला विरोध केला आहे. त्याचबरोबर मूर्तीपूजेलाही विरोध केल्यामुळे प्रारंभीच्याकाळात बौध्द धर्मामध्ये हिनयान पंथाचे प्राबल्य होते. या पंथाने मूर्तीएवजी स्मारकपूजा पत्करली होती.गौतमांचे शरिरावशेष, त्याच्या रोजच्या वापरातील वस्तू, उदा. त्यांचा दात, पायाचा ठसा, पाणी प्यायचे भांडे यांची पूजा तसेच त्यांना ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली आहे तो वृक्ष स्तूप इत्यादिची पूजा केली जात होती. तसेच त्याच्या काही प्रमुख शिष्यांचे अवशेष जतन केले होते.(नेपाल), गया (बिहार) पहिला येथील मृगदापीयन आणि त्याच्या महापरिनिर्वाणाचे ठिकाण नगर आरती सोया, रामगृह, वैशाली या ठिकाणी गौतमाने आपल्या अंगातील प्रत्यय आणून दिला म्हणून तेथेही स्तूप आहे.

**महायानपंथ**

गौतम बुध्दाच्या मृत्यूनंतर काही काळाने एक परिवर्तन आले. इ.स. पहिल्या- दुसऱ्या शतकापर्यंत बौध्द धर्मात हीनयान पंथीयांचे म्हणजेच बुद्धाची प्रतीकात्मक गुफा करण्यात आली. पण ही मूर्ती तयार करून तिची पूजा करावी असे म्हणून महायानपंथीयांनी सुरुवात केली. कारण याच सुमारास मागे पडलेला वैदिक धर्म नव्या स्वरुपात परावर्तीत होऊन जनमानसात मूळ धरु लागला होता. शिव विष्णु देवी गणपती सूर्य कार्तिकेय श्रीराम संकर्षण आदी देवतांची पूजा तात्कालीन समाजात लोकप्रिय होऊ लागली होती. तेव्हा बौध्द धर्माची लोकप्रियता टिकवून ठेवण्यासाठी ती तयार करून तिची उपासना करण्याची गरज तीव्रतेने भासू लागली होती. कृषाण राजा कनिष्क (पहिला) याने चौथी बौध्दधर्मपरिषद मीरमध्ये कुंडलवन येथे घेऊन महायानपंथीयांना पाठींबा दिला. त्याचीच परिणीती गांधार व मथुरा येथील युध्दमूर्तिकलेचा उदय झाला. आणि पुढे हस्यौदाचे मूर्तीशास्त्र निर्माण झाले.

ग्रीक-रोमन कलासंप्रदाय गांधार शिल्प शैलीचा उदय व विकास कुषाणकाळात घडून आला. तत्कालीन समाजाच्या आशा कक्षा प्रतिसाद देण्यासाठी कनिष्काने बुध्दाची मूर्ती घडविण्याच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले. तसेच त्याचे प्रतिबिंब गांधारकलेत उमटले

व तिथे पहिली युध्दभूती तयार झाली. साधारणपणे आजचा अफगानिस्थान म्हणजे एकेकाळचा गांधार देश येथील इंडो- प्रकशक पहल आदी राजघराण्यांचा भारतीय कलेचा ग्रीक व रोमन कलेशी जास्त परिचय होता. त्यामुळे गांधारकलेतील रूपके सर्वस्वी भारतीय असली तरी त्यांचा घडणीवर ग्रीक शैलीचा प्रभाव पडला आहे. गांधारकलेतील युध्द अंडाकृती चेहरा, अर्धोन्मिलित नेत्र, सफाईने कोरलेल्या भुवया, समुद्राच्या लांटासारखा दिसणारा केसांचा झुपकर, सरळ नाक, लांबट कान, कमावलेले शरीर, पिळदार स्नायू, मोठमोठया मिशा, हाडाच्या सांगाडयासारखी मुलांची घडण ही गांधारकलेतील घडविल्या गेलेल्या बुध्दमूर्तीची वैशिष्टये आहेत. बुद्धावताराचे नेमके मर्म न समजल्याने या ठिकाणी घडविली गेलेली बुध्दमुर्ती प्रभावहीन ठरते. या मूर्तीतील पुरुषाच्या चेहऱ्यावर देवी अंश अजिबात दिसत नाही. उलट मार्दवयुक्त स्मित दिसते. गौतमाला वृध्दत्व प्राप्त झाल्यानंतर त्याच्या चेहऱ्यावर फरक पडलेला येथे जाणवत नाही. त्याचा जयसंभार एखादया साधूसन्यांशासारखा असलातरी बुध्द म्हणजे दया क्षमा, शांतीचे प्रतीक आहे असे अजिबात जाणवत नाही. गांधारकलेतील घडविलेल्या सर्व युध्दमतीचे चेहरे, तसेच त्यांचे उभे राहण्याची ढब हे सगळे आपोलो या ग्रीक देवतेच्या किंवा ऑगस्टस या रोमन संम्राटाच्या घडविण्यात आलेल्या पुतळयासारखीच आहेत.

भारतीय आणि परकीय कलेतील फरक ग्रीक आणि इतर युरोपीय कलेमध्ये चेहऱ्यावरील भावनादर्शनापेक्षा शरीरशास्त्राला अधिक महत्व दिले गेले आहे. स्त्री-पुरुषांची अतिशय प्रमाणमध्द शिल्पे कोरण्यामध्ये युरोपीयन कलाकारांचा हात कोणीच धरु शकणार नाही ही शिल्पे कोरताना माणसांची ताकद व त्यांच्या सुदृढपणावर भर दिलेला दिसतो. तसेच भरदार छाती व पिळदार स्नायू स्पष्ट दाखविलेले असतात म्हणजेच मूर्तीशिल्पातील पुरुषांच्या प्रचंड सामर्थ्याचे दर्शन घडविणे हा प्रधान उद्देश दिसतो. याउलट भारतीय कला ही चेहऱ्यावरील भावदर्शन स्पष्ट करण्याला प्राधान्य देणारी आहे. शरीररचनाशास्त्राबरोबरच त्यांनी शिल्पातील आंतरिक भावसौंदर्यही तितक्याच कल्पकतेने, तन्मयतेने आणि रसिकतेने स्पष्ट केले आहे. भारतीय कलेमधून तत्कालीन धार्मिक, सामाजिक व राजकीय विचारांचे प्रतिबिंध दिसते.

**मयूराकलेतील युध्द**

कुषाणकाळात गांधारकलेबरोबर मथुरा येथेही शिल्पकलेचा उदय झाला. बुध्दमूर्तीची निर्मिती हे त्या काळातील कलेचे एक प्रमुख वैशिष्टय होते. कुरळे केस, अर्धोन्मिलित नेत्र, पदमासन, दोन्ही भुवयांच्या मध्ये ऊर्णा चिन्ह, सजावटयुक्त मूर्तीचा प्रभामंडल, आणि मुख्य म्हणजे बुध्दांच्या चेहऱ्यावरील ध्यानस्त भाव. ही मथुराकलेतील बुद्धाची काही ठळक वैशिष्टये आहेत.मथुरा येथील कलाकार हे अस्सल भारतीय परंपरेतील असल्याने त्यांना गौतम बुध्दाच्या चरित्राचे मर्म ठाऊक होते त्यावर हुकुम बुध्दाची मूर्ती कशी घडवावी याविषयी त्यांच्या कल्पना स्पष्ट होत्या. मथुराकलेतील बुध्दशिल्पाची बाह्यघडण जरी पाहीली तर त्यामध्ये अर्थातच गौतमांच्या देवी शक्तीची जाणीव होईल अशी काही वैशिष्टये त्यांच्या शरीरावर दिसतात. त्याच्या हातापायांच्या तळव्यावर चक्रे फोरलेली दिसतात. त्याशिवाय कपाळाच्या मधोमध ऊर्णा (तृतीय नेत्र) कोरलेले दिसते. त्याच्या कानाच्या पाळया मानवी पाळयाप्रमाणे खूपच लांब दाखवित असत. कठोर तपश्चर्यानंतर बुध्दत्व प्राप्त झाल्यानंतरचे बुध्दाच्या चेहऱ्यावरचे शांत व आभ्यासक भाव नेमकेपणाने उतरले आहेत. बुध्दमूर्ती नेहमी अभयमुद्रेत दाखविलेली असते. याशिवाय भूमिस्पर्शमुद्रा.महानिर्वाणमुद्रा या त्याच्या इतर मुद्राही प्रसिध्द आहेत. प्रवचन

देताना अथवा आपल्या धर्माची तत्वे समजाऊन सांगताना बुध्द व्याख्यानमुद्रेने दाखविला आहे. त्याने एक सर्वस्वी नवीन धर्म स्थापन केला, समाजाला एक नाव विचार दिला. हे हे धर्मचक्रप्रर्वतन मुद्रेतून दर्शविले आहे म्हणजेच गांधारकलेत जे आहे ते आणि जसे आहे तसे शिल्पित करण्यात आले पण मथुराकलेत त्यापलिकडील अर्थ शोधण्याचा प्रयत्न झाला आणि त्यात कलाकार पूर्णतः यशस्वी झाले आहेत.

**निष्कर्ष**

अशा रीतीने गौतम बुध्दाशी संबंधित असलेल्या स्तूप वा इतर वास्तू व त्याने प्रत्यक्ष वापरलेल्या वस्तुची आणि त्यांच्या शरीरविषेशांची पूजा करण्यापासून बुध्दमूर्ती घडविण्यापर्यंतचा शिल्पप्रवास मोठा रोचक व रंजक आहे. तत्कालीन हीनयान व महायान या बौध्द धर्मातील दोन पंथांच्या विचारसरणीचे बीजे मुख्यतः अग्नेय आशियातील बुध्द मूर्तींच्या घडणीमध्ये आढळतात. भारतामध्ये सिक्कीम, अरुणाचलप्रदेश, आदी ठिकाणच्या बुध्दमुर्तींच्या घडणीमध्ये वज्रयानपंथीयाच्या विचाररसरणीचे प्राबल्य जावणते एकंदरीत बौध्द धर्माचा उदय व विकास त्यांची विशिष्ट विचाररणी त्यापेक्षाही तत्कालीन स्थापत्य शिल्प व मूर्तीकलेतून झालेला त्यांचा आविष्कार हे भारतवर्षाच्या इतिहासातील एक सुवर्णाचे पान म्हणून गणले जाते.

**संदर्भ ग्रंथ**


१. मूर्तीविज्ञान- ग. ह. खरे, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १३३४.

२. प्राचीन भारतीय कला- म. श्री. मोरे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७५.

३. भारतीय मूर्तीशास्त्र नी. पु. जोशी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, १९७९.

४. प्राचीन कलाभारती - श्री. माटे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, २००३.

५. मध्ययुगीन कलाभारती - श्री मारे कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणे. १९८०.